स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजीक शास्त्र विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयात पीएच.डी.पदवीच्या नोंदणीसाठी सादर करावयाच्या नियोजीत संशोधन प्रकल्प आराखडा

संशोधन विषय

न्यायालयीन सक्रीयता: एक चिकित्सक अभ्यास

संशोधन केंद्र

पिपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्गदर्शक

डॉ.एम.आर.कदम

राज्यशास्त्र विभाग,

श्री शिवाजी कॉलेज कंधार

संशोधक

साईचरण व्यंकटेश पेंडकर

प्रस्तावनाः—

ब्रिटिश भारतापुर्वी भारतामध्ये प्रामुख्याने राजे महाराजे, पंचायती, जात पंचायती, खापपंचायती यांच्या माध्यमातुन न्यायदान केले जात असे आजही महाराष्ट्रात, राजस्थान, पंजाब इ. ठिकाणी पंचायती, जात पंचायती इ. माध्यमातून गावाचे न्यायदान केल्याचे संदर्भ दिसून येतात. भारतात अकबरी न्यायपध्दती, शिवाजी जिजाऊ न्यायदानपध्दती, पेशवेकालीन रामशास्त्र प्रभूचे न्यायपध्दती सर्वात चांगली असल्याचे संदर्भ इतिहासात सापडतात. कालांतराने ब्रिटिश भारतात आल्यानंतर राजे महाराजे पंचायतीच्या माध्यमातुन केली जाणारी न्यायव्यवस्था मोडकळीस आणली व ब्रिटिश न्यायवस्थेचा पाया भारतात घातला या बरोबर प्रत्येक प्रांतात उच्च न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली.

राज्यघटनेचे संरक्षक, राज्य घटनेतील अर्थ लावणे तसेच नागरिकांच्या मुलभुत हक्कांचे रक्षण करणे हे संविधानाच्या कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालय तसेच कलम २२६ नुसार उच्च न्यायालय हि अतिशय महत्वाचे कार्य न्यायालयाची मानली जातात १०० अपराधी सूटले तरी चालतील पण एका निरपराध्यावर अन्याय होत कामा नये या तत्वावर भरतिय न्यायव्यवस्था आधारलेले आहे असे असले तरी भारतीय कायदेमंडळ अशिक्षीत कायदयाचे ज्ञान नसणारे होसे, नवसे, गवसे कायदे तयार करताना दिसून येतात व याचा परिणाम असा होतो की अशा लोकांनी तयार केलेल्या कायदयाचा अर्थ लावण्याचे काम मा.उच्च विदयाविभूशित कायदेप्रवीण न्यायधीशाना करावे लागते कधी कधी तरी कायदेमंडळातील सदस्य अनावश्यक कायदे निर्मीतीस प्रोत्साहन देताना दिसुन येतात अशावेळी न्यायालयास सक्रीय होउन आपली जबाबदारी पार पाडावी लागते.

‘न्यायालयीन सक्रीयता ही १९८० च्या दशकानंतर भरतीय शासन प्रक्रियेत उदयाला आलेले एक महत्वपुर्ण घटीत आहे. राजकीय जीवनात व्यापार स्तरावर लोकानुरंजनवाद, मुल्यहीनता, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, लोकशाही मुल्याचा —हास अशी दुरावस्था निर्माण झाल्यानंतर न्यायालयाने काही महत्वपुर्ण निकाल देवुन सामान्य जनतेच्या आकाक्षा उंचावल्या.

आधुनिक लोकशाही राज्यांच्या सिद्धांतात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या शासनाच्या तीन शाखांवर सत्ता विभाजनेच्या तत्वाद्वारे विशिष्ट जबाबदारी सोपावलेली असते. त्याचप्रमाणे कोणत्याही शाखेने परस्परांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करु नये यासाठी सत्ता संतुलन साधलेले असते. मात्र या तीन शाखांपैकी एखादी शाखा आपले सोपावलेले विविध कार्य योग्य रितीने पार पाडु शकत नसल्यास, त्यामुळे शासन कारभारात असंतुलन किंवा पोकळी निर्माण होते.

भारतात कायदेमंडळाचा खालावलेला दर्जा, शासन कारभारातील मोठया प्रमाणात आढळणारा भ्रष्टाचार, गुन्हेगारी, लोकशाही मुल्यांचा झालेला —हास इत्यादी बाबींमुळे

संसद आणि कार्यकारी मंडळाची कार्यक्षमता घटली. या प्रक्रीयेमुळे सामान्य जनता आपल्या आशा, आकांक्षाच्या पुर्ततेसाठी न्यायालयाकडे दाद मागु लागली. भारतातील न्यायमंडळाने सुरुवातीच्या काळातील तांत्रीक व अति वैधानीक दृष्टिकोनाचा त्याग करुन सामान्य जनतेच्या अपेक्षांना प्रतिसाद देवुन शासन प्रशासनाच्या क्षेत्रात आपली सक्रीयता वाढली. यातुन भारतीय राजकीय पटलावर 'न्यायालयीन सक्रीयता' या घटीताचा उदय झाला.

भारतीय संविधानाच्या ५ व ६ व्या भागात कलम १२४ ते १४५ मध्ये न्यायव्यवस्थेबाबत तरतुदी करण्यात आली आहे. भारतीय न्यायव्यवस्थेचे संदर्भ वैदिक काळापासून आढळूण येतात पण भारतीय न्यायव्यवस्था ही ख—या अर्थाने ब्रिटिश कालखंडात विकसित पावली किंवा न्यायवस्थेला एक विशीष्ट प्रकारे दिशा मिळाली कारण त्या आधी ब—याच ठिकाणी 'बळी तो कान पिळी' मत्स न्याय निती आढळून येत होती न्याय नेहमी बहुसंख्याक सत्ताधारी लोकांच्या हातात असायची त्यामुळे तो न्याय नव्हता अल्पसंख्याक मात्र विनाकारण त्यास बळी पडत असत.

कालांतराने विविध ब्रिटिश कायदे उदा १७७३ रेग्युलेटिंग ॲक्ट , १७८४ चे पीस्ट इंडिया ॲक्ट, १७९३, १७१३, १७३३, १७५३ चे चार्टर ॲक्ट, १९३५ चा भारतसरकारच्या कायदा इ. विविध कायदयामध्ये न्यायलयीन तरतुदी करण्यात आली व न्यायालयीन सुधारणा घडवुन आणण्यात आल्या आहेत.

१९३५ च्या कायदयाअंतर्गत संघराज्य शासन पध्दती निर्माण केली संघराज्यातील केंद्र—राज्य यामधील संघर्ष मिटविण्यासाठी संघीक न्यायालयाची निर्मीती केली या संघीक न्यायालयाला 'फेडरल कोर्ट ऑफ इंडिया' असे संबोधण्यात आले भारतातील मुंबई, मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद या उच्चन्यायालयांच्या विरुध्द फेडरल कोर्टात अपील करता येत असे.

ज्या बाबीची पुर्तता करणे हे वास्विकपणे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची जबाबदारी असते अशा बाबीसंबंधी जेव्हा न्यायलय निर्णय देत असते अशावेळी न्यायालय सक्रीय झाले असे म्हटले जाते.

१ कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ यांना राज्यघटनेने दिलेली कार्य व्यवस्थित रित्या पार पाडत नसतील व त्यामुळे लोकशाही शासन/प्रशासन, राजकारणात धोका निर्माण होत असेल तर त्यावेळी न्याय मंडळ आपणहुन सक्रीय होउन कायदेमंडळ व कार्यकारी मंडळास आपल्या जबाबदारीची जाणीव करुन देते यास न्यायालयीन सक्रीयता असे म्हणतात.

२ कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्याकडून होणा—या पण न झालेल्या कामाची अपेक्षा जनता न्यायालयाकडुन करते व न्यायालय याबाबत पुढाकार

घेउन जनतेच्या अपेक्षा पूर्ण करते व त्या कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांना निर्देश देते त्यास न्यायालयीन क्रियाशीलता किंवा न्यायालयीन सक्रीयता असे म्हणतात.

संशोधन समस्या

भारतात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे शासनव्यवस्थेचे तीन अंग असुन त्यांच्यात योग्य समन्वय साधुन कल्याणकारी राज्याची संकल्पना साध्य करावयाचे असुन कायदेमंडळामार्फत शासनविषयक योग्य निर्णय घेवुन नागरिकांच्या मुलभुत हक्कांवर अन्याय होवु न देता परिणामकारक कायदयांची निर्मिती/अंमलबजावणी करणे. जर नागरिकांच्या मुलभुत हक्कांवर अन्याय होत असेल तर किंवा कायदेमंडळ अनुचीत निर्णय घेत असेल तर त्यात न्यायालय न्यायालयीन सक्रीयतेच्या आधारे मुलीुत हक्कांचे रक्षण कशाप्रकारे करते व न्यायालयासमोरील आव्हाने कोणते आहेत, याबाबतचा शोध घेणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधन अभ्यासाचे महत्त्व

भारतीय न्यायव्यवस्थेच्या सक्रीयतेचा योग्य माहितीपुर्ण अध्ययन करुन न्यायालयीन सक्रीयतेचा विविध उदाहरणांची माहिती घेवुन त्यांचा योग्य जनकल्याणासाठी व्यावहारीक जीवनात उपयोग करणे.

संशोधनाची उद्दिष्टे

भारतीय न्यायव्यवस्थेतील न्यायालयीन सक्रीयता: एक चिकित्सक अभ्यास हा प्रस्तुत संशोधनाचा मुख्य हेतु आहे. या मुख्य हेतुच्या अनुषंगाने खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

१. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.
२. जनहीत याचीकांची व्याप्ती वस्वरुप अभ्यासणे.
३. न्यायालयीन स्वातंत्र्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
४. न्यायालयीन सक्रीयतेस कारणीभुत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके

प्रस्तुत संशोधनाची काही गृहीतके समोर ठेवण्यात आली आहेत.

१. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या कार्यक्षमतेमुळे न्यायालयीन सक्रीयतेचा उदय झाला आहे.

२. न्यायालयीन सक्रीयतेमध्ये जनहीताला प्राधान्य आहे.
३. न्यायालयीन सक्रीयतेला कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांची कार्यप्रणाली जबाबदार आहे.
४. भारतीय न्यायालयीन सक्रीयतेचे स्वरुप पुरोगामी स्वरुपाचे आहे.
५. भारतीय न्यायालयीन सक्रीयतेच्या व्याप्तीत मोठी वाढ झाली आहे.
६. भारतीय न्यायालयीन सक्रीयतेला जनहित याचीकांमुळे व्यापक स्वरुप प्राप्त झाले आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे अध्ययनविषयक व विश्लेषणात्मक असून हे संशोधन कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ तसेच न्यायमंडळ यांच्या अधिकार जबाबदारी तसेच कर्तव्यांचे योग्य पालना संदर्भातील आहे या बद्दल विविध प्रसंगी न्यायालयाने केलेले हस्तक्षेप व जबाबदारीचे योग्य पालन या संदर्भतिल अध्ययन विषयक संशोधन आहे.

संशोधन आराखडा

१. प्रकरण पहिले—प्रस्तावना
२. प्रकरण दुसरे— न्यायाचा उदय व विकास
३. प्रकरण तिसरे— भारतीय न्यायव्यवस्था
४. प्रकरण चौथे— न्यायालयीन सक्रीयता
५. प्रकरण पाचवे— समारोप

संशोधनाची निष्कर्ष

१. भारतातील प्राचीन न्यायव्यवस्थेत न्यायाचा अर्थ, धर्म या संकल्पनेशी जोडलेला आहे.
२. न्यायाची व्याख्या निश्चीत स्वरुपात आढळत नाही.
३. न्याय ही संकल्पना मानवी संमुहाशी संबंधीत आहे.
४. न्यायालयीन भ्रष्टाचारातही वाढ झालेला आहे.
५. न्यायमंडळावर कायदे मंडळाचा प्रभाव दिसुन येत आहे.

संशोधनाची शिफारशी

१. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यापासुन न्यायमंडळ स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे.
२. नि:पक्ष न्यायपद्धतीवर भर देणे आवश्यक आहे.
३. कायदेमंडळ, कार्यकारी मंडह तसेच न्यायमंडळ यांच्यात समन्वय साधने आवश्यक आहे.

४. कायदेमंडळांमार्फत लोकशाही मुल्यांचे जपवणुक करणे महत्वाचे आहे.
५. नागरिकांच्या मुलभुत हक्कांवर अन्याय होत असेल तर न्यायालय हस्तक्षेप करुन त्याचा बचाव करणे अत्यंत आवश्यक आहे.

संशोधक	मार्गदर्शक
पेंडकर साईचरण व्यंकटेश	डॉ एम आर कदम

संदर्भ सुची

१	भारतीय शासन व राजकारण	अल्का देशमुख
२	एम लक्ष्मिकांत	भारतिय संविधान व राजकारण
३	रंजन कोळंबे	भारतीय प्रशासन व राजकारण
४	जनहित याचीका	अम्रत जुन २००९
५	जजेस ऑण जेजिंग व्हिव फाम द बेंच	डी वाय डेव्हिड
६	भारतीय राज्य व शासन व्यवस्था	रा ज लोटे